# पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी ४११०१८

## मा. फ प्रभाग समिती

## कार्यपत्रिका क्रमांक – ११

## सभावृत्तांत

दिनांक – ०७/०१/२०१९ वेळ : स. ११.१५

---

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या मा. फ प्रभाग समितीची मासिक सभा सोमवार दिनांक ०७/०१/२०१९ रोजी स. ११.१५ वा. फ प्रभाग कार्यालयाचे राजर्षी शाहू महाराज सभागृहामध्ये आयोजित करणेत आली होती. सदर सभेस खालील सन्मा. सदस्य उपस्थित होते.

| | | |
|---|---|---|
| १. | मा. घोलप कमल अनिल | सभापती |
| २. | मा. स्वीनल कपिल म्हेत्रे | सदस्य |
| ३. | मा. साधना अंकुश मळेकर | सदस्य |
| ४. | मा. अश्विनी भिमा बोबडे | सदस्य |
| ५. | मा. योगिता ज्ञानेश्वर नागरगोजे | सदस्य |
| ६. | मा. भालेकर प्रविण महादेव | सदस्य |
| ७. | मा. पौर्णिमा रविंद्र (आप्पा) सोनवणे | सदस्य |
| ८. | मा. संगिता (नानी) प्रभाकर ताम्हाणे | सदस्य |
| ९. | मा. उत्तम प्रकाश केंदळे | सदस्य |
| १०. | मा. पवळे सुमनताई मधुकर | सदस्य |
| ११. | मा. चिखले सचिन तुकाराम | सदस्य |
| १२. | मा. दिनेश लालचंद यादव | नामनिर्देशित सदस्य |
| १३. | मा. संतोष भाऊसाहेब मोरे | नामनिर्देशित सदस्य |
| १४. | मा. पांडुरंग गुलाब भालेकर | नामनिर्देशित सदस्य |

याशिवाय खालील अधिकारी / कर्मचारी उपस्थित होते.

मा. प्रभावती गाडेकर - प्रशासन अधिकारी, मा. प्रविण घोडे -कार्यकारी अभियंता (वि.), मा. श्रीकांत सवणे -कार्यकारी अभियंता (स्था), मा. तुपसाखरे संजय - उपअभियंता (पा.पु.), मा. खोंद्रे मोहन ईश्वरा - उपअभियंता (झोनिपू स्था.), मा. सतिश वाघमारे- उपअभियंता (स्था), मा. अशोक अडसुळे - उपअभियंता (वि.), मा. रामगुडे डि. ई.- उपअभियंता (स्था), मा. हनुमंत शिंदे - उपअभियंता (जनि.), मा. शहाजी गायकवाड - उपअभियंता (स्था.), मा. शेखर चंद्रकांत गुरव - कनिष्ठ अभियंता ( न.रचना), मा. जोशी आतुल - कनिष्ठ अभियंता (पा.पु.), मा. शेख एस. के. - कनिष्ठ अभियंता ( झोनिपू), मा. जाधव एस. एस. - कनिष्ठ अभियंता (पा.पु.), मा. जी. जी. कांबळे – उद्यान सहाय्यक, मा. धाकोजी शिर्के सहा. आरोग्याधिकारी, मा. मोहन निकम (लेखाधिकारी), मा. गिरीश सलगरकर – मुख्य लिपीक, हे उपस्थित होते.

मा. कमल अनिल घोलप यांनी उपस्थितांचे स्वागत करुन सभेचे कामकाज सुरु करणेस अनुमती दिली.

अ) कार्यक्रम पत्रिका क्रमांक ९ व १० मंगळवार दिनांक ०४/१२/२०१८ रोजी झालेल्या सभेच्या सभावृत्तांत कामय करणेत येत आहे असे मा. सभापती यांनी प्रकट केले.



Scanned by CamScanner

मा.सभापती व उपस्थित सन्मा. सदस्यांचे संमतीने खालील ऐनवेळचे विषय सभा कामकाजामध्ये दाखल करुन घेणेत आले.

विषय क्रमांक - ४. फ क्षेत्रीय कार्यालयाचे कार्यक्षेत्रातील नो हॉकर्स झोन (फेरीवाला निषिध्द क्षेत्र) जागा निश्चित करणेबाबत. (प्रशासन विभागाकडील पत्र क्रमांक फक्षेका/२/कावि/३८७/१९ दिनांक ०४/०१/२०१९)

विषय क्रमांक - ५. पिंपरी चिंचवड महानगर पालिकेची कै.किसनराव अंतुजी भालेकर प्राथमिक शाळा क्र. ९८, तळवडे या शाळेच्या इमारतीस प्रवेशद्वार (कमान) नावनिशी बांधकाम करुन मिळणेबाबत. (मा. संगिता (नानी) प्रभाकर ताम्हाणे, मा. भालेकर प्रविण महादेव व मा. पौर्णिमा रविंद्र (आप्पा) सोनवणे यांचा मान्य प्रस्ताव)

विषय क्रमांक - ६. प्रभाग क्र. १२, ताम्हाणेवस्ती भागातील चिखली तळवडे शिवेचा रस्ता आणि चिंचेच्या मळ्यातुन येणारा रस्ता ज्याठिकाणी जोडला जातो त्या चौकाचे **"ताम्हाणेमळा चौक "** असे नामकरण करणेबाबत.
(मा. भालेकर प्रविण महादेव, मा. पौर्णिमा रविंद्र (आप्पा) सोनवणे यांचा प्रस्ताव)

विषय क्रमांक - ७. जयपूर – उदयपूर महानगरपालिकेस भेट देणेबाबत तसेच सार्व. वाचनालय या लेखाशिर्षावरील शिल्लक रकमेतून र.रु.१,५०,०००/- प्रभाग समिती प्रवासखर्च या लेखाशिर्षावर तरतूद वर्ग करणे बाबत...

---

विषय क्र - १ | ठराव क्र. - २१
दिनांक - ०७/०१/२०१९ | विभाग – प्रशासन

संदर्भ - मा. क्षेत्रीय अधिकारी, फ क्षेत्रीय कार्यालय, यांचेकडील पत्र क्रमांक फक्षेका/२/कावि/३६०/२०१८ दिनांक - ०३/११/२०१८.

फ क्षेत्रीय कार्यालयाच्या कार्यक्षेत्रात हॉकर्स झोनचे निश्चित केलेल्या ठिकाणास नेमणेत आलेल्या उपसमिती मार्फत प्रत्यक्ष स्थळपाहणी करुन हॉकर्स ठिकाणे निश्चित करणेत आलेली आहेत. सदर ठिकाणांना मा.प्रभाग समितीची मान्यता घेणेत येऊन सदरचा विषय शहर फेरीवाला समितीकडे अंतिम मान्यते कामी सादर करावयाचा असल्याने मान्यता देणेबाबत विचार करणे. (सोबत हॉकर्स झोन निश्चित केलेल्या ठिकाणांची प्रभागनिहाय यादी.)

सदर विषय पुढील मासिक सभेपर्यंत सर्वानुमते तहकुब करणेत आला असे.

---

विषय क्र - २ | ठराव क्र. - २२
दिनांक - ०७/०१/२०१९ | विभाग – प्रशासन
सुचक- मा.भालेकर प्रविण महादेव | अनुमोदक- मा. पौर्णिमा रविंद्र (आप्पा) सोनवणे

संदर्भ - मा. क्षेत्रीय अधिकारी, फ क्षेत्रीय कार्यालय, यांचेकडील पत्र क्रमांक फक्षेसावा/कावि/४४/२०१८ दिनांक – २४/१२/२०१८.



Scanned by CamScanner

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्य फ क्षेत्रीय कार्यालयांतर्गत कै. रमाबाई केशवराव ठाकरे सार्वजनिक वाचनालयाकरीता सन २०१८ चे दिवाळी अंक खरेदी केली आहे. संबंधित पुरवठा धारकाने विहित मुदतीत एकुण १०३ दिवाळी अंकांचा पुरवठा चलन क्र. १ ते ३ अन्वये केलेला आहे. एकुण दिवाळी अंकाची किंमत र.रु. १६९७५/- असुन त्यावर २५% सवलतीचे र.रु. ४२४३/- वजा जाता एकुण बिल र.रु. १२७३२/- इतके सादर केले आहे. सदर दिवाळी अंक सुस्थितीत असुन दिवाळी अंकांची नोंद दिवाळी अंक नोंद रजिस्टरला घेणेत आलेली आहे. तरी सदरच्या र.रु. १२७३२/- च्या खर्चास कार्योत्तर मान्यता देणेत येत आहे.

सदर विषय सर्वानुमते मान्य झाला.

--------------

विषय क्र - ३
दिनांक - ०७/०१/२०१९
सुचक- मा.भालेकर प्रविण महादेव

ठराव क्र. - २३
विभाग – प्रशासन
अनुमोदक- मा. पौर्णिमा रविंद्र (आप्पा) सोनवणे

संदर्भ - मा. क्षेत्रीय अधिकारी, फ क्षेत्रीय कार्यालय, यांचेकडील पत्र क्रमांक फक्षेका/नि-४/कावि/७४९/२०१९ दिनांक – ०३/०१/२०१९.

फ क्षेत्रीय कार्यालयाचे सन २०१८-१९ चे सुधारीतव सन २०१९-२० चे मुळ अदाजपत्रक छपाईसाठी कोटेशन नोटीस क्र.१/२०१८-१९ अन्वये महानगरपालिका वेबसाईटवर व क्षेत्रीय कार्यालयाचे नोटीस बोर्डवर प्रसिध्द करणेत आलेली आहे. सदरचे अंदाजपत्रकाच्या ३० प्रती छपाईकामी अंदाजे एकुण र.रु.३५०००/- (जी.एस.टी.सह.) खर्च अपेक्षित आहे. तरी, सदर खर्चास मा.प्रभाग समिती सभेची मान्यता देणेत येत आहे..

सदर विषय सर्वानुमते मान्य झाला.

---------------

**सभा कामकाजात दाखल करुन घेणेत आलेले विषय घेणेत आले.**

विषय क्र - ४
दिनांक - ०७/०१/२०१९
सुचक- मा.भालेकर प्रविण महादेव

ठराव क्र. - २४
विभाग – प्रशासन
अनुमोदक- मा. पौर्णिमा रविंद्र (आप्पा) सोनवणे

संदर्भ - मा. क्षेत्रीय अधिकारी, फ क्षेत्रीय कार्यालय, यांचेकडील पत्र क्रमांक फक्षेका/२/कावि/३८७/२०१९दिनांक -०४/०१/२०१९

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या ‘फ’ क्षेत्रीय कार्यालयाच्या कार्यक्षेत्रातील हॉकर्स झोन ( फेरीवाला क्षेत्र ) साठी जी जागा निश्चित करणेत आलेली आहे त्या जागांची समक्ष पाहणी करणेत आलेली असून सदर हॉकर्स झोन (फेरीवाला क्षेत्र) क्षेत्रास मा.प्रभाग समिती सभेची मान्यता घेणे प्रस्तावित आहे आणि खालिल ठिकाणी नो हॉकर्स झोन ( फेरीवाला निषिद्ध क्षेत्र ) प्रस्तावित आहे.

Scanned by CamScanner

| अ.क्र. | ठिकाणाचे नाव | कोठून कोठेपर्यंत |
|---|---|---|
| १ | टिळक चौक, निगडी बसस्टॉप | चौकापासुन चारही बाजूने १५०.०० मीटर |
| २ | साने चौक चिखली ते शिवरकर चौक चिखली | साने चौक चिखली ते शिवरकर चौक रस्त्याच्या दोन्ही बाजूने १५०.०० मीटर |
| ३ | थरमॅक्स चौक ते साने चौक चिखली | थरमॅक्स चौक ते साने चौकापर्यंत संपूर्ण रस्ता |
| ४ | घरकुल योजना चौक पुर्णानगर चिखली | चौकापासून चारही बाजूने १५०.०० मीटर |
| ५ | चिखली चौक | देहू ते आळंदी रस्त्याच्या दोन्ही बाजूने १५०.०० मीटर |
| ६ | तळवडे चौक | देहू ते आळंदी रस्त्याच्या दोन्ही बाजूने १५०.०० मीटर |
| ७ | स्पाईन रस्ता | संपूर्ण स्पाईन रस्ता |
| ८ | BRTS रस्ता | संपूर्ण BRTS रस्ता |

उपरोक्त १ ते ८ नो हॉकर्स झोन ( फेरीवाला निषिद्ध क्षेत्र ) बाबत मान्यता देणेत येत आहे.

सदर विषय सर्वानुमते मान्य झाला.

----------------

विषय क्र - ५
दिनांक - ०७/०१/२०१९
सुचक - मा. संगिता (नानी) प्रभाकर ताम्हाणे

ठराव क्र. - २५
विभाग – सदस्य
अनुमोदक – मा. भालेकर प्रविण महादेव
अनुमोदक – मा. पौर्णिमा रविंद्र (आप्पा) सोनवणे

संदर्भ – मा. संगिता (नानी) प्रभाकर ताम्हाणे, मा. भालेकर प्रविण महादेव, मा. पौर्णिमा रविंद्र (आप्पा) सोनवणे यांचा प्रस्ताव

पिंपरी चिंचवड महानगर पालिकेच्या, कै.किसनराव अंतुजी भालेकर प्राथमिक शाळा क्र. ९८, तळवडे या शाळेच्या इमारतीस प्रवेशद्वार (कमान) नावनिशी बांधकाम करुन मिळणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर विषय सर्वानुमते मान्य झाला.

--------------

विषय क्र - ६
दिनांक - ०७/०१/२०१९
सुचक - मा. संगिता (नानी) प्रभाकर ताम्हाणे
मा. भालेकर प्रविण महादेव

ठराव क्र. - २६
विभाग – सदस्य
अनुमोदक – मा. पौर्णिमा रविंद्र (आप्पा) सोनवणे

संदर्भ – मा. संगिता (नानी) प्रभाकर ताम्हाणे, मा. भालेकर प्रविण महादेव, मा. पौर्णिमा रविंद्र (आप्पा) सोनवणे यांचा प्रस्ताव

प्रभाग क्र. १२, ताम्हाणेवस्ती भागातील चिखली तळवडे शिवेचा रस्ता आणि चिंचेच्या मळ्यातुन येणारा रस्ता ज्याठिकाणी जोडला जातो त्या चौकाचे **"ताम्हाणेमळा चौक "** असे नामकरण करणेस मान्यता देणेत येतआहे.

सदर विषय सर्वानुमते मान्य झाला.

---------



Scanned by CamScanner

विषय क्र - ७
दिनांक - ०७/०१/२०१९
सुचक - मा. कमल अनिल घोलप
मा. पवळे सुमनताई मधुकर

ठराव क्र. - २७
विभाग – सदस्य
अनुमोदक- मा. पौर्णिमा रविंद्र (आप्पा) सोनवणे

संदर्भ – मा. कमल अनिल घोलप, मा.पवळे सुमनताई मधुकर, मा. पवळे सुमनताई मधुकर यांचा प्रस्ताव

स्वच्छ भारत अभियान अंतर्गत जयपूर, उदयपूर (राजस्थान) महानगरपालिकेने राबविलेल्या विविध योजना व प्रकल्पांची पाहणी करुन त्याप्रमाणे पिंपरी चिंचवड महानगरपालिकेमध्ये त्यातील चांगल्या योजना व प्रकल्पांची अंमलबजावणी करणेचे दृष्टीने फ क्षेत्रीय कार्यालयाचे समिती सदस्य व महानगरपालिकेचे अधिकारी यांचेकरिता जयपूर-उदयपूर (राजस्थान) महानगरपालिका येथे पाहणी करणेकामी दौरा आयोजित करणे व अभ्यास दौ-यासाठी येणा-या प्रत्यक्ष खर्चास मान्यता देणेत येत आहे.

तसेच फ क्षेत्रीय कार्यालयाकडील प्रभाग समिती प्रवास खर्च या लेखाशिर्षावर सन २०१८-१९ करीता र.रु. ७५,०००/-तरतुद करणेत आलेली आहे. प्रस्तूत दौ-यासाठी अंदाजे र.रु. २,००,०००/- खर्च अपेक्षीत आहे. फ क्षेत्रीय कार्यालयाकडील सार्व. वाचनालय या लेखाशिर्षासाठी सन 2018-19 करीता र.रु. ८,००,०००/- तरतूद करणेत आलेली असून सद्यस्थितीत र.रु. २,०१,७९६/- खर्च झालेला असून र.रु. ५,९८,२०४/- शिल्लक आहेत. सदर शिल्लक तरतुदीमधून र. रु. १,५०,०००/- प्रभाग समिती प्रवास खर्च या लेखाशिर्षावर वर्ग करण्यास मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव कायम होणेची वाट न पाहता मा. स्थायी समिती कडे मंजुरीसाठी पाठविणेत यावा.

सदर विषय सर्वानुमते मान्य झाला.

-----------

यानंतर मा. सभापती यांनी सभा संपल्याचे जाहिर केले.

(कमल अनिल घोलप )
सभापती
फ प्रभाग समिती निगडी,

पिंपरी चिंचवड महानगरपालिका
फ क्षेत्रीय कार्यालय,निगडी ४४
क्र.फक्षेका/सभा/कावि/०२/२०१९
दिनांक. ९/०१/२०१९

प्रशासन अधिकारी
तथा
सचिव ( सभाशाखा )
फ प्रभाग समिती निगडी,

प्रत – सर्व संबंधित शाखाप्रमुख व शाखाधिकारी यांचेकडे
पुढील योग्य त्या कार्यवाहीसाठी रवाना.

Scanned by CamScanner